| | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद परभणी (शिक्का) | आरोग्य सेवा<br>**जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय**<br>जिल्हा परिषद परभणी | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

दुरध्वनी क्रमांक :- 02452 - 220526.
Email Id :- dhopar@redifmail.com.

जा.क्र.जि.प.प./आ.वि./आस्था-2/कावि/ 953 /2025

दिनांक :- 27/ 3/2025

ईमेलव्दारे / रजिस्ट्रीस्पीड पोस्ट व्दारे

प्रति,
श्री योगेश पंडीत बखाले,
प्लॉट नं. 42 SR.NO– 191, कालिक नगर
हरसुल, औरंगाबाद– 431008

विषय:-जिल्हा परिषद सरळसेवा परभरती २०२३, संवर्ग-आरोग्य सेवक (पुरूष) ५० टक्के कागदपत्र पडताळणी करिता दिनांक ०२/०४/२०२५ सकाळी उपस्थित राहणे बाबत.

संदर्भ:-१. मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती यांची मान्य टिप्पणी क्र. ४२

उपरोक्त संदर्भिय टिप्पणी क्र. ४२ नुसार जिल्हा परिषद परभणी अंतर्गत पदभरती २०२३ च्या अनुषंगाने आरोग्य सेवक (पुरूष) ५० टक्के या संवर्गातील हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी अनुभव असलेल्या पात्र उमेदवाराची शासन पत्र दि. १५/१०/२०२४ मध्ये नमुद केल्यानुसार मुळ शैक्षणिक कागदपत्र व इतर आवश्यक सर्व दस्ता ऐवजाची पडताळणी दि. ०२/०४/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. करण्यात येणार आहे.

तरी आपण जाहिरातीत नमुद (अ.क्र.१९) प्रमाणे मुळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर सर्व आवश्यक कागदपत्रे तसेच हंगामी फवारणी कर्मचारी असलेले अनुभव प्रमाण पत्र व काम केलेले हजेरी पत्रक आणी त्या दरम्यान मिळालेल्या वेतनाचे बँक विवरण पत्र (स्टेटमेंट) इत्यादी बाबी दोन प्रतित (साक्षांकीत करून) दि. ०२/०४/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. आरोग्य विभाग जिल्हा परिषद परभणी येथे न चुकता उपस्थित रहावे. उक्त दिनांक ०२/०४/२०२५ रोजी कागदपत्र पडताळणी करिता गैरहजर राहिल्यास, निवड प्रक्रिये संबंधात कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

सोबत – जाहिरातीत नमुद (अ.क्र.१९ ची प्रत)

(स्वाक्षरी)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद परभणी

प्रतिलीपी:- मा. अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी परभणी यांना माहितीस्तव सविनय सादर.

sd/-
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद परभणी

... विहित कागदपत्रे / प्रमाणपत्र सादर करणे

सदर परीक्षेच्या निकालानंतर तात्पुरत्या निवड यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणीसाठी आवश्यकतेनुसार खालील कागदपत्रे / प्रमाणपत्रे (लागू असलेली) सादर करणे अनिवार्य आहे.

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणापत्र |
| २ | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा |
| ३ | वयाचा पुरावा |
| ४ | जन्माचा पुरावा |
| ५ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा |
| ६ | राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र |
| ७ | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (चालू आर्थिक वर्षातील) |
| ८ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| ९ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| १० | खेळाडूंसाठीच्या आरक्षणाकरिता पात्र असल्याचा पुरावा |
| ११ | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| १२ | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र |
| १३ | महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला |
| १४ | विवाहीत स्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १५ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| १६ | लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन |
| १७ | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| १८ | MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र |
| १९ | टंकलेखन प्रमाणपत्र |
| २० | लघुलेखन प्रमाणपत्र |
| २१ | अनुभव प्रमाणपत्र |